

# पतंगाचा नायलॉन मांजा पक्षांसाठी घातक

## Maharashtra Pakshimitra

मिळून सर्वजण करु द्विजगण रक्षण !
महाराष्ट्र पक्षीमित्र
स्थापना १९८९

**Makar sankranti**
***Cotton thread**
**& Local manja**




International Kite Festival in Gujarat – Uttarayan









# Kite – cottage Industry











# Nylon and Glass Coated Manja Industry







**Nylon Manja is Non degradable like Plastic**








झाडावरील मांजात अडकून मेलेला दुर्मिळ घुबड (अमरावती)

**Rare Brown Hawk Owl**
**Amravati (Octomber 2017)**




Hundreds of **birds** are grievously injured every year by glass-coated **kite** strings. Many NGO's working for Bird Rescue






**Protest against use of Nylon Manja (New Delhi)**

पुढारी

# नायलॉन मांजामुळे पक्षी, मानवी जीवावर 'संक्रांत'

## दिल्लीनंतर महाराष्ट्रात बंदी, तरीही खुलेआम विक्री; कडक कारवाईची गरज






नाशिक : नायलॉन मांजामुळे परिसरात जखमी झालेले पक्षी.

**नाशिक : आनंद बोरा**

जानेवारी महिना उजाडला की, सर्वांना वेध लागतात ते मकरसंक्रांत या सणाचे. संक्रांतीनिमित्त पतंगोत्सव साजरा करण्याची आपल्याकडे जुनी परंपरा आहे. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वजण पतंग उडवण्याचा आनंद घेतात. पण अलीकडे हा खेळ जीवघेणा ठरत आहे. पूर्वी पतंग उडवण्यासाठी दोऱ्याचा किंवा घरगुती मांजाचा वापर केला जायचा. आता मात्र पतंग उडवण्यासाठी नायलॉनच्या मांजाचा वापर केला जात असल्याने पक्ष्यांबरोबरच मानवी जीवनावरदेखील यामुळे संक्रांत येत आहे. पतंग काटाकाटीच्या खेळात दरवर्षी शेकडो पक्षी बळी पडत असून, नागरिक देखील गंभीर जखमी होत असल्याचे प्रकार सातत्याने समोर येत आहेत.

नायलॉन मांजाचे दुष्परिणाम लक्षात घेता, दिल्लीत या मांजावर बंदी घालण्यात आली आहे. पाठोपाठ महाराष्ट्रातदेखील याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र, अशातही सर्रासपणे या मांजाची विक्री केली जात असल्याने, मकरसंक्रांत या गोडवा निर्माण करणाऱ्या सणाला काहीसे कडवट रूप येत आहे. नायलॉन मांजामुळे आतापर्यंत शेकडो पक्ष्यांना आपला जीव गमवावा लागला आहे. निसर्गरम्य वातावरणासाठी ओळखल्या जाणाऱ्या नाशिकमध्ये पक्ष्यांचा मोठा राबता आहे. दरवर्षी विदेशी पक्षी स्थलांतर करीत नाशिकमध्ये मुक्कामासाठी येतात. याव्यतिरिक्त पक्ष्यांच्या अनेक दुर्मीळ प्रजाती नाशिकमध्ये आढळून येतात. मात्र, नायलॉन मांजा या पक्ष्यांच्या जीवावर उठत आहे. हा मांजा कुजत किंवा नष्ट होत नसल्याने, वर्षानुवर्षे या मांजाचे दुष्परिणाम पक्ष्यांना भोगावे लागत आहेत. केवळ पक्षीच नाही, तर मानवी जीवनासाठीदेखील हा मांजा घातक ठरत आहे. या मांजामुळे आतापर्यंत अनेकांना गंभीर दुखापत झाली आहे. काहींना मांजामुळे कायमचे अपंगत्व आले आहे, तर काहींचा जीवही गेला आहे. या सर्व बाबी लक्षात घेता, मांजावर बंदी आणली गेली असली, तरी त्याचा सर्रास वापर केला जात आहे.

**२४ पक्षी गतप्राण; ३८ जायबंद**

मागील दोन वर्षांत जिल्ह्यात तब्बल २४ पक्षी गतप्राण झाले असून, ३८ पक्षी जायबंद झाले आहेत. यामध्ये पोपट, चिमणी, साळुंकी, कावळे, कबुतर, दयाळ, आर्दीचा समावेश आहे. रात्री भरारी घेणारे गव्हाणी घुबडही यास बळी पडले आहेत. घार, कापशी घार, बगळे, शराटी या पक्ष्यांवर दरवर्षी संक्रांत असते.



नायलॉन मांजामुळे जखमी पक्ष्यांवर उपचार करणे अवघड असते. अनेक पक्ष्यांना कायमस्वरूपी अपंगत्व येते. त्यामुळे त्यांना आयुष्यभर पिंजऱ्यात किंवा झूमध्ये राहावे लागते. नायलॉन मांजाच्या बंदीची कठोर अंमलबजावणी आणि विद्यार्थांमध्ये जनजागृती होणे आवश्यक आहे

- **डॉ. संजय गायकवाड,** सहआयुक्त, प्रादेशिक पशुसंवर्धन



२०१७ साली राष्ट्रीय हरित लवादाने मांजाचा व्यापार, साठवणूक, विक्री व वापर यावर बंदी घातली आहे. त्यामुळे विविध कायद्यांतर्गत कारवाई करता येते. मात्र, याबाबत शासकीय यंत्रणा व नागरिकांमधे जनजागृती होणे आवश्यक आहे. महाराष्ट्र पक्षिमित्रतर्फे याबाबत प्रयत्न केले जात आहेत.

- **डॉ. जयंत वडतकर,** अध्यक्ष, महाराष्ट्र पक्षिमित्र



नायलॉन मांजा न वापरता पतंग उडविण्याचा आनंद घ्यायला हवा. जखमी पक्षी आढळल्यास तत्काळ वनविभाग किंवा पक्षिमित्रांशी संपर्क साधावा. शक्यतो, खुल्या मैदानात पतंगी उडवाव्यात.

- **शेखर देवकर,** प्रभारी सहायक वनसंरक्षक, नांदूरमध्यमेश्वर पक्षी अभयारण्य

### या पक्ष्यांवर 'संक्रांत'

शराटी, घुबड, पांढऱ्या मानेचा करकोचा, राखाडी छातीची पाणकोंबडी, ग्रेट थिकणी, शिक्रा, चिमणी, कबुतर, पोपट, कावळे, साळुंकी, घार आदी पक्षी नायलॉन मांजाच्या जाळ्यात अडकून बळी पडतात.



### एक वर्षाची शिक्षा

नायलॉन मांजा, काचेचा मांजा साठा व विक्री करण्यास बंदी असून, महाराष्ट्र पोलिस अधिनियम कलम ३७/१/अ अन्वये शिक्षेची तरतूद आहे. कमीत कमी चार महिने आणि जास्तीत जास्त एक वर्षापर्यंतची शिक्षा होऊ शकते.

divyamarathi.com शनिवार

प्रशासकीय उदासीनतेमुळे निष्पापांचे जीव धोक्यात • बंदी, तुरुंगवासाच्या शिक्षेचे

# नायलॉन मांजा उठला जिवावर

प्रतिनिधी | वैजापूर/ जळगाव

बंदी घातलेल्या नायलॉन मांजाची पोलिस व प्रशासनाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे सर्रास विक्री होत आहे. संक्रांतीच्या निमित्ताने जानेवारी महिन्यात त्याचा वापर वाढत असतो. मात्र हा मांजा नागरिकांच्या जीवावर उठल्याच्या दोन घटना घडल्या. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापुरात शुक्रवारी एका युवकाचा मांजाने गळा चिरला तर जळगाव जिल्ह्यातील ११ वर्षीय बालिकेच्या पायाच्या तीन नसा कापल्या गेल्या.

## रक्तबंबाळ अवस्थेत दुचाकीवरून कोसळल्यामुळे प्रकृती गंभीर, संभाजीनगरच्या रुग्णालयात हलवले

वैजापूरच्या साई पार्क परिसरात पतंग उडवणाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे दुचाकीस्वार गणेश बाळासाहेब गलांडे (वय ३०, रा. गलांडे वस्ती) या शेतकऱ्याच्या गळ्याला नायलॉन मांजा घासून केला. यात त्याचा गळा अक्षरशः चिरला गेला. क्षणार्धात गणेश दुचाकीवरून खाली पडला. ही घटना शुक्रवारी सायंकाळी घडली.

### प्रचंड रक्तस्राव झाल्याने संभाजीनगरला हलवले



गळा चिरल्यामुळे मोठ्या प्रमाणावर रक्तस्राव होत होता. नागरिकांनी तातडीने त्याला उपजिल्हा रुग्णालयात नेले. तेथे वैद्यकीय अधिकारी डॉ. पाठक यांनी प्राथमिक उपचार करून त्याला संभाजीनगर येथील रुग्णालयात हलवण्यात आले. जखमी भरण्यासाठी गळ्याला टाके लावल्याची प्राथमिक माहिती आहे.

# नायलॉन मांजावर बंदीसाठी निसर्गयात्रीचे निवेदन

सकाळ वृत्तसेवा

पंढरपूर, ता. ७ : पतंगाच्या नायलॉन, चायनीज मांजामुळे देशात प्रत्येक वर्षात हजारो पक्ष्यांना जीव गमवावा लागतो. अनेक पक्षी कायमचे जायबंदी होतात. वाहनांवरील व्यक्तींचे गळे चिरण्याच्या घटना घडतात. हे लक्षात घेऊन राष्ट्रीय हरित लवाद (नॅशनल ग्रीन ट्रॅब्युनल) ने नॉयलॉन, चायनीच मांजाचा व्यापार, साठवणूक, विक्री आणि वापरावर सरसकट बंदी घातली आहे. या निर्णयाची तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी येथील निसर्गयात्री संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष गोविंद सबनीस, श्रीकांत बडवे यांनी निवेदनाद्वारे पोलिस व अन्य विभागांकडे केली आहे.

याप्रसंगी मिलिंद गाताडे, आनंद सरवदे, बापू कदम, रामभाऊ परचंडे, संदीप बडवे, धनराज कडलाख, योगेश कटकमवार, अमर खरात, आकाश चव्हाण, अजित पवार, गणेश गोब्बुर, विनय बडवे, नवनाथ कदम, श्रीकांत बडवे उपस्थित होते.



पंढरपूर : येथे सोमवारी शहर पोलिस ठाण्याचे निरीक्षक विठ्ठल दबडे यांना निवेदन देताना श्रीकांत बडवे, मिलिंद गाताडे, आनंद सरवदे, बापू कदम, रामभाऊ परचंडे, गणेश गोब्बूर.

# नायलॉन मांजावर संपूर्ण बंदी

वृत्तसंस्था/नवी दिल्ली

पतंग उडवण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या नायलॉनच्या मांजावर पूर्णपणे बंदी घालण्याचा निर्णय राष्ट्रीय हरित लवादाने (एनजीटी) घेतला आहे. एनजीटीने मंगळवारी यासंदर्भातील निर्णयाची घोषणा केली.

त्यानुसार आता नायलॉन आणि अविघटनशील पदार्थांपासून बनविण्यात येणाऱ्या मांजावर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून बाजारात धोकादायक नायलॉन मांजाची खरेदी-विक्री व वापर सुरू होता. पर्यावरणाला हानीकारक, प्राणी व पक्ष्यांसाठी जीवघेणा ठरलेला तसेच आबालवृद्ध व वाहनचालक ते पादचाऱ्यांचा हकनाक बळी घेणाऱ्या नायलॉन मांजावर बंदी घालण्यात आली होती. पतंग उडवण्यासाठी वापरला



## हरित लवादाचे आदेश

जाणारा नायलॉन मांजा नागरिकांचे गळे चिरणारा आणि झाडांवर अडकलेला मांजा पक्ष्यांना जखमी करणारा ठरला आहे. त्यामुळे पक्षीप्रेमींनी या मांजावर बंदीची मागणी केली होती. मात्र, या निर्णयाची योग्य पद्धतीने अंमलबजावणी होत नव्हती. या पार्श्वभूमीवर आज हरित लवादाकडून याबाबत सक्तीचे आदेश लागू करण्यात आले आहेत.

गेल्या काही वर्षांमध्ये शहरी भागात नायलॉनच्या मांजामुळे नागरिकांचे विशेषतः वाहनधारकांचे नाक, कान, गळे चिरण्याच्या घटना पतंगोत्सवाच्या सुमारास घडताहेत. यात पक्षीदेखील मोठ्या प्रमाणात जखमी होतात. त्यामुळे या मांजाच्या वापरावर सर्वोच्च न्यायालयाने बंदी घातली आहे. मुंबई पोलिसांनीही या मांजाचा वापर टाळण्याची ताकीद देणारी सूचना जारी केली होती. मात्र, तरीही यंदा हे आदेश धाब्यावर बसवून पतंग उडवण्यासाठी नायलॉनच्या मांजाचा वापर करण्यात आला होता. त्यामुळे मकरसंक्रांतीच्या काळात ५० हून अधिक पक्षी मांजामुळे गंभीर जखमी झाल्याचे समोर आले होते. मांजामुळे पंख व मानेला जखम झाल्याने या पक्ष्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मकरसंक्रांतीच्या काळात हा मांजा जवळ बाळगल्यास अथवा त्याची विक्री केल्यास संबंधितांवर गुन्हे दाखल करणार असल्याचे मुंबई पोलिसांनी स्पष्ट केले होते. मात्र तरीही या मांजाचा वापर सर्रासपणे करण्यात आला होता.

६ जानेवारी २०२४ १२ राज्ये | ६१ आवृत्त्या

कायदे फक्त कागदावरच, पोलिसांच्या इशाऱ्यांना भीक घालत नाहीत व्यावसायिक

## वैजापूर : मांजा घासल्याने दुचाकीवरून जाणाऱ्या तरुण शेतकऱ्याचा गळा चिरला

## जळगाव : आईसोबत हळदीला जाणाऱ्या मुलीच्या पायाच्या तीन शिरा कापल्या

### चालण्यास बळ देणारी शिर कापली गेल्याने करावी लागली शस्त्रक्रिया, नातलगांकडून जमा केले पैसे

जळगाव | पिंप्राळा येथील ११ वर्षीय मुलगी दुर्गा बापू माळी ही आई व लहान बहिणीसोबत हळदीच्या कार्यक्रमात जात असताना तिच्या पायात नायलॉन मांजा अडकला. त्यातच दुसऱ्या बाजूने हा मांजा एका मुलाने ती ओढल्याने दुर्गाच्या उजव्या पायाच्या तीन रक्तवाहिन्या कापल्या गेल्या.

उर्वरित. पान १२

### जखम भरायला लागेल अजून दीड महिना



मुलीच्या पायाला दोन सेमीपर्यंत खोलवर जखम झाली. चालण्यासाठी बळ देणारी रक्तवाहिनी व इतर दोन कापल्या गेल्या. शस्त्रक्रियेने त्या जुळवल्या आहेत. जखम भरण्यास दीड महिना लागेल. मुलीला वर्षभर त्रास जाणवेल. - डॉ. श्रीराज महाजन, प्लास्टिक व कॉस्मेटिक सर्जन

**दिव्य मराठी आवाहन**

### आपल्या हौसेपेक्षा इतरांची जीव मोलाचा...

नायलॉन मांजा विक्रीस बंदी आहे. बेपर्वा प्रशासन व पैशाच्या मोहापायी विक्रेत्यांना मात्र त्याचे भान नाही. पतंगबाजी करणाऱ्यांनी तरी हा मांजा खरेदी करताना विचार करावा. केवळ आपल्या हौसेपेक्षा नागरिकांचे व मुक्या प्राण्यांचे जीव जाणार नाहीत याचे भान असायला हवे. म्हणूनच नायलॉन मांजाला नको म्हणा...

# नायलॉन, चिनी मांजावर देशात बंदी

## हरित लवादाचा आदेश

पीटीआय, नवी दिल्ली



[illegible]

# नायलॉन, चायनीज मांजासाठा, विक्री, वापरावर थेट बंदी

## राष्ट्रीय हरित लवादाचा महत्त्वपूर्ण निर्णय

सकाळ वृत्तसेवा

जळगाव, ता. १४ : नायलॉन व चायनीज मांजाच्या व्यापार, साठा, विक्री व वापरावर थेट बंदी घालण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय नुकताच राष्ट्रीय हरित लवादाने (National Green Tribunal) दिला आहे.

नायलॉन, चायनीज मांज्यामुळे दरवर्षी हजारो पक्ष्यांना आपला जीव गमवावा लागत आहे. पक्ष्यांचे प्राण वाचविणाऱ्या या निर्णयाचे स्वागत करीत असून आता या नायलॉन/ चायनीज मांजाच्या व्यापार, साठवणूक, विक्री व वापरावर सरसकट बंदी घालण्यास शासकीय यंत्रणेला कोणतीच कायदेशीर अडचण उद्‌भवणार नसल्याने कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी त्यांनी केली.

मार्चला महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाने पर्यावरण (संवर्धन) अधिनियम १९८६ कायदा कलम ५ अंतर्गत नायलॉन/ चायनीज मांजावर बंदी घालणारे परिपत्रक पारित केले होते. देशभरातील अनेक राज्यांनी सुद्धा अशाप्रकारचा प्रयत्न केला होता. मात्र या मार्गदर्शक तत्त्वांना कुठलाही कायदेशीर आधार नसल्यामुळे वनविभाग व पोलिस यंत्रणा यांना कार्यवाही करताना अडचण येत होती व त्यामुळेच मांज्याचे व्यापारी व वापरकर्ते यांच्याकडून या परिपत्रकाला सर्रास हरताळ फासला जात होता. त्यामुळे याविरोधात राष्ट्रीय हरित लवादाकडे याचिका दाखल करण्यात आली, त्यावर लवादाने त्यावर बंदी घालण्याचा निर्णय दिला आहे.

दरम्यान, यासंदर्भात राष्ट्रीय हरित लवादाने दिलेल्या निर्णयामुळे पक्ष्यांचे संरक्षण, संवर्धन सुकर होणार आहे. या निर्णयाच्या आधारे कलेक्टर, पोलिस अधीक्षक, वनविभाग अधिकारी यांना निवेदन देण्यात येईल, तसेच कुणी हा मांजा विकत अथवा वापरत असेल तर त्यांच्यावर कठोर कारवाई करावी अशी मागणी पक्षीमित्र शिल्पा व राजेंद्र गाडगीळ केली .



संग्रहित छायाचित्र

जळगाव ToDay सकाळ १५-७-२०१७

# नायलॉन, चायनीज मांजाच्या विक्रीस संपूर्ण बंदी

## राष्ट्रीय हरित लवादाचा महत्त्वपूर्ण निर्णय

जळगाव : नायलॉन, चायनीज मांजाच्या व्यापार, साठवणूक, विक्री व वापरावर सरसकट बंदी घालण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय नुकताच दि.११ जुलै २०१७ रोजी राष्ट्रीय हरित लवादाने दिला आहे.

या निर्णयावर पक्षिमित्र शिल्पा व राजेंद्र गाडगीळ म्हणाले की, आम्ही या निर्णयाची चातकासारखी वाट बघत होतो. कारण या नायलॉन, चायनीज मांज्यामुळे दरवर्षी हजारो पक्ष्यांना आपला जीव गमवावा लागत आहे. पक्ष्यांचे प्राण वाचविणाऱ्या या निर्णयाचे आम्ही स्वागत करीत असून आता या नायलॉन, चायनीज मांजाच्या व्यापार, साठवणूक, विक्री व वापरावर सरसकट बंदी घालण्यास शासकीय यंत्रणेला कोणतीच कायदेशीर अडचण उद्‌भवणार नसल्याने कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली. दि. ३० मार्च २०१५ ला महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाने 'पर्यावरण (संवर्धन) कायदा १९८६ सेक्शन ५ अंतर्गत नायलॉन,चायनीज मांजावर बंदी' घालणारे परिपत्रक पारित केले होते. देशभरातील अनेक राज्यांनीसुद्धा अशाच प्रकारचा प्रयत्न केला होता. मात्र या मार्गदर्शक तत्वांना कुठलाही कायदेशीर आधार नसल्यामुळे वनविभाग व पोलीस यंत्रणा यांना कार्यवाही करताना अडचण येत होती व त्यामुळेच मांज्याचे व्यापारी व वापरकर्ते यांचेकडून या परिपत्रकाला सर्रास हरताळ फासला जात होता. लवकरच राष्ट्रीय हरित लवादाने दिलेल्या निर्णयाच्या आधारे कलेक्टर, पोलीस अधीक्षक, वन विभाग अधिकारी यांना निवेदन देणार असल्याचे राजेंद्र गाडगीळ म्हणाले. आता पक्ष्यांचे प्राण वाचविण्यासाठी मांजाविरोधी कोणतीही कायदेशीर अडचण नसल्याने जळगाव जिल्ह्यात नायलॉन,चायनीज मांजाच्या व्यापार, साठवणूक, विक्री व वापरावर सरसकट बंदी घालावी व या महत्त्वपूर्ण निर्णयाच्या आधारे त्या सर्वांविरुद्ध कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी पक्षिमित्र शिल्पा व राजेंद्र गाडगीळ केली.





जळगाव सिटी पुण्य नागरी १५-७-२०१७



# बंदी असलेल्या मांजाची विक्री बंद करावी

## अंबाजोगाईत पक्षी व निसर्गप्रेमींची मागणी

अंबाजोगाई, ता. ४ (बातमीदार) : राष्ट्रीय हरित लवादाने नुकत्याच बंदी घातलेल्या नायलॉन व चायनीज मांजाची विक्री बंद करण्याची मागणी गुरुवारी (ता.३) येथील निसर्गप्रेमी व पक्षी मित्रांनी उपजिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

नायलॉन व चायनीज मांजामुळे वाहन चालविणाऱ्या व्यक्ती व पक्षी जखमी झाले. तसेच काही जणांचे बळीही गेल्याच्या घटना घडलेल्या आहेत. त्यामुळे अशा मांजावर बंदी घालण्याची मागणी प्राणिमित्र संघटना व पक्षीमित्रांकडून झाली होती. राज्यातील पक्षीमित्रांच्या संमेलनातही या विषयावर चर्चा झाली होती. ३० मार्च २०१५ रोजी राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाने बंदी घालणारे परिपत्रकही पारित केले होते; परंतु या मार्गदर्शक तत्त्वांना कुठलाही कायदेशीर आधार नसल्यामुळे वनविभाग व पोलिस यंत्रणांना कार्यवाही करताना अडचणी येत होत्या. त्यामुळे मांजाचे व्यापारी व वापरकर्त्यांकडून या मांजाचा वापर होत होता. या संदर्भात ११ जुलै २०१७ रोजी राष्ट्रीय हरित लवादाने नायलॉन व चायनीज मांजाचा व्यापार, विक्री व वापरावर सरसकट बंदी घातली.

या निर्णयाच्या आधारे आता मांजाच्या वापरावर प्रत्यक्षात बंदी आणणे आवश्यक आहे. बंदीच्या आदेशाची मोठ्या प्रमाणात जनजागृती करून मांजाचा व्यापार, विक्री, साठवणूक व वापरावर प्रत्यक्षात कारवाई करावी, अशी मागणी येथील पक्षीमित्र, निसर्गप्रेमींनी केली आहे. या मागणीसाठी शहरातील पत्रास पक्षी मित्र, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक, प्राध्यापक व निसर्गप्रेमींनी पुढाकार घेतला.



अंबाजोगाई : नायलॉनच्या मांजामुळे जखमी झालेले कबुतर.

# राष्ट्रीय हरित लवाद चा Date 11 July 2017 चा निर्णय

**BEFORE THE NATIONAL GREEN TRIBUNAL**
**PRINCIPAL BENCH**
**NEW DELHI**

**Original Application No. 384 of 2016**
**And**
**Original Application No. 442 of 2016**
**MA. Nos. 1247/2016 & 317/2017**

1) **Justice Swatanter Kumar (Chair)**
2) **Justice R. S. Rathod (Member)**
3) **Justice Bikram Singh Sajwan (Expert Member)**

Judgment, appropriate steps be taken against the defaulters under the provision of Environment (Protection) Act, 1986; Prevention of Cruelty of Animal Act, 1960; Wildlife (Protection) Act, 1972, the Indian Penal Code or any other provision of law.

considered at preliminary stage. It was thought just and proper on **14th December 2016** that due protection needs to be given to wildlife as well as environment, besides the resultant injuries/ deaths of human beings. Accordingly, directions were issued **"that in the entire country there shall be prohibition on procuring, stocking, sale and use of nylon thread which is also**

**called Chinese Dor or Chinese manjha and other synthetic thread coated with glass and such other harmful substances for kite flying".** However, it was made **clear that cotton thread, other than aforesaid thread, could be used for kite flying but such thread which is glass coated or coated** with other harmful material will not be permitted to be used for the same.

5. The Chief Secretaries/Administrators of all the States/Union Territories are further directed to send a copy of this order to all the district Collectors/District Magistrates and Superintendent of Police for its compliance in letter and spirit and to ensure that no synthetic manjha/nylon thread and also those which are coated with synthetic materials are purchased, sold, stored and used for kite flying within their area.

2. The State Governments are directed to prohibit the manufacture, sale, store, purchase and use of synthetic *Manjha/Nylon* thread and all other similar synthetic threads, used for kite flying.

3. All the Chief Secretaries/Administrators of the State Governments and Union Territories are directed to enforce the prohibition of manufacture and use of synthetic *manjha*/nylon thread for kite flying throughout

# लोकमत

# पतंगाच्या नायलॉन दोऱ्यावर बंदी घाला

## महाराष्ट्र पक्षिमित्र संघटनेची मागणी : जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवे पारगाव :** राष्ट्रीय हरित लवादकडून घालण्यात आलेल्या पतंगाच्या नायलॉन - चायनीज दोऱ्यांच्या व्यापार, विक्री, वापर, साठवणूक यावर सरसकट बंदी घालावी, अशी मागणी महाराष्ट्र पक्षी निरीक्षण संघटना व चावरे (ता. हातकणंगले) येथील विवेकानंद फाउंडेशनने जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे, पतंगाच्या नायलॉन-चायनीज दोऱ्यामुळे दरवर्षी अनेक मुले जखमी होतात. वाहनावरील व्यक्तींचा चेहरा व गळे चिरण्याच्या घटना घडत असतात.



नायलॉन दोरा वापरावर बंदी घालावी याबाबत जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार यांना निवेदन देताना पक्षिमित्र संघटनेचे निमंत्रित सदस्य युवराज पाटील, विवेकानंद फौंडेशनचे सचिव राजेंद्र घोडके उपस्थित होते.

पतंग उडवत असताना देशात हजारो पक्ष्यांना आपला जीव गमवावा लागतो. काहीवेळा कायमचे जायबंदी व्हावे लागते. त्यामुळे या दोऱ्यावर बंदी घालण्याची मागणी पीडितांच्या संबंधितांकडून, पेटा या प्राणिमित्र संघटनेकडून व महाराष्ट्रात पक्षिमित्रांकडून होत होती.

'महाराष्ट्र पक्षिमित्र'कडून सुद्धा विविध पक्षी संमेलनांमध्ये या विषयावर सातत्याने चर्चा होत होती. तसा ठराव मंजूर करून याबाबत शासनाकडून बंदी घातली जावी यासाठी प्रयत्न केले जात होते. शासनाच्या पर्यावरण विभागाने नायलॉन-चायनीज दोऱ्यावर बंदी घालणारे परिपत्रक मंजूर केले होते. देशभरातील अनेक राज्यांनीसुद्धा प्रयत्न केला होता, परंतु या मार्गदर्शक तत्त्वांना हरताळ फासला जात आहे. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) व संचालक सह्याद्री व्याघ्र प्रकल्प (वन्यजीव), जिल्हा पोलीस अधीक्षक कोल्हापूर यांनाही कारवाई करण्यासंबंधी निवेदनाच्या प्रती देण्यात आल्या.

Kolhapur Main
Page No. 5 Aug 28, 2017
Powered by: erelego.com

**महाराष्ट्र पक्षिमित्र कडून NGT च्या निर्णयाचे स्वागत व जनजागृती**



पंढरपूर : येथे सोमवारी शहर पोलिस ठाण्याचे निरीक्षक विठ्ठल दबडे यांना निवेदन देताना श्रीकांत बडवे, मिलिंद गाताडे, आनंद सरवदे, बापू कदम, रामभाऊ परचंडे, गणेश गोब्बूर.



# नायलॉन मांजा बंदीची अंमलबजावणी व्हावी

## निसर्गयात्री संघटनेची तहसीलदारांकडे मागणी

**पंढरपूर / शहर प्रतिनिधी**

पतंग उडविण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या नायलॉन, चायनीज मांजावरील बंदीची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी मागणी येथील निसर्ग यात्री संघटनेचे अध्यक्ष गोविंद सबनीस यांनी तहसीलदारांकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

नायलॉन, चायनीज मांजामुळे दरवर्षी हजारो पक्षांना जीव गमवावा लागतो, अथवा कायमचे जायबंदी व्हावे लागते. अनेक मुले जखमी होतात. यासह वाहन चालकांना अपघातांना सामोरे जावे लागत असल्याचे वारंवार स्पष्ट झाले आहे. त्यामुळे अशा मांजावर बंदी घालण्याच्या मागणीसाठी प्राणीमित्र व पक्षीमित्र संघटनांनी सतत पाठपुरावा केला. त्यानुसार राज्य शासनाच्या पर्यावरा विभागाने नायलॉन, चायनीज मांजावर बंदी घालणारे परिपत्रक काढले आहे. तसेच राष्ट्रीय हरित लवादाकडूनही नुकताच यासंदर्भात महत्वपूर्ण निर्णय झाला आहे. असे असले तरी या निर्णयाच्या ची अंमलबजावणी होत नाही. नायलॉन, चायनीज मांजाच्या व्यापारी, साठवणूक विक्रीवर त्वरीत ठोस कारवाईची गरज आहे. याबरोबरच जनजागृतीचीही आवश्यकता आहे. यासंदर्भात शासनाकडून ठोस कार्यवाही व्हावी, अशी मागणी सबनीस यांनी या निवेदनाद्वारे केली आहे.

आज हे निवेदन तससिलदार, पंढरपूर, वनविभाग व पोलीस स्थानकात देण्यात आले. याप्रसंगी श्रीकांत बडवे, मिलींद गाताडे, आनंद सर्वदे, बापु कदम, रामभाउ परचंडे, संदिप बडवे, धनराज कडलाक, योगेश कटकमवार, अमर खरात,आकाश चव्हाण, अजित पवार, गणेश गोब्बुर, विनय बडवे, नवनाथ कदम आदी पक्षीप्रेमी उपस्थित होते.

**पंढरपूर कोल्हापूर**

मिळून सर्वजण करू द्विजगण रक्षण !

महाराष्ट्र पक्षीमित्र

स्थापना १९८१

# THANKS